महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे-४११००४

क्रमांक रा.मं/पापुअ/पापुई/संशोधन/इ.१०वी, पुनर्रचित अभ्यासक्रम/४१५६,दिनांक-३ ऑगस्ट २०१८

संदर्भ: महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद(विद्या प्राधिकरण)पुणे-३०यांचे जा.क्र.मराशैसंप्रप./अविवि/इ.१०वी विषययोजना व मूल्यमापन/२०१८-१९/२७३२. दि.१४/६/२०१८.

## परिपत्रक

या परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न सर्व माध्यमिक शाळाप्रमुखांना कळविण्यात येते की, विद्या प्राधिकरणामार्फत इ.१०वीचा अभ्यासक्रम पुनर्रचित करुन विषय योजना तसेच मूल्यमापन योजनेत बदल करण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने पाठयपुस्तके तयार करण्यात आलेली आहेत. त्यांची अंमलबजावणी इ.१०वी साठी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुरु होत आहे. अभ्यासक्रम पुनर्रचनेच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये पुनर्रचित अभ्यासक्रम, विषययोजना, मूल्यमापन आणि तासिका नियोजनाबाबत कळविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने हे परिपत्रक प्रसिध्द करण्यात येत आहे.

१) माहिती संप्रेषण तंत्रज्ञान ( ICT )या विषयाचा समावेश एकात्मिक स्वरुपात सर्व विषयामधून केला असल्याने जून २०१७ पासून इ. ९ वी व जून २०१८ पासून इ. १० वी साठी स्वतंत्र विषय बंद होत असल्यामुळे सदर विषयात मार्च २०१८ च्या परीक्षेअखेर इ. १० वी मध्ये सदर विषयात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना जुलै २०१८ व मार्च २०१९ अशा दोनच संधी उपलब्ध राहतील.

२) सामान्य गणित हा विषय जून २०१७ पासून इ. ९ वी व जून २०१८ पासून इ. १० वी साठी बंद होत असल्यामुळे सदर विषयात मार्च २०१८ च्या परीक्षे अखेर इ. १० वी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना जुलै २०१८ व मार्च २०१९ अशा दोनच संधी उपलब्ध राहतील.

३) भाषा विषयात अनुत्तीर्ण झालेल्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी जुलै २०१८ व मार्च २०१९ च्या इ. १० वी परीक्षेस पुनर्परीक्षार्थी म्हणून प्रविष्ठ झाल्यास अशा परीक्षार्थी विद्यार्थ्यांना तोंडी परीक्षेस पुन्हा प्रविष्ठ होणे अनिवार्य आहे.

४) **गणित (बीजगणित व भूमिती):-**

(I) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी पुनःश्च गणित विषयाच्या परीक्षेस प्रविष्ठ झाल्यानंतर आधीच्या वर्षाचे अंतर्गत मूल्यमापनाचे गुण शाळेने पाठवावयाचे असल्यामुळे याबाबतचे रेकॉर्ड शाळेनें जपून ठेवणे आवश्यक आहे.

(II) खाजगी विद्यार्थी:-(Private Candidate) खाजगी विद्यार्थ्यांसाठी प्रचलित पध्दतीप्रमाणे गणित स्वाध्यायपुस्तिकेस २० गुण असतील स्वाध्यायपुस्तिका संपर्क केंद्रावर विभागीय मंडळामार्फत पुरविण्यात येतील. केंद्रप्रमुखांनी स्वाध्यायपुस्तिका तपासण्याची व्यवस्था करावी व प्रचलित पद्धतीचा अवलंब करावा.

५) विज्ञान आणि तंत्रज्ञान:-

(I) **पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी** विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयाची २० गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा लेखी परीक्षेबरोबर पुनःश्च होणार आहे.

(II) **खाजगी विद्यार्थी:-**(Private Candidate)विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयाच्या खाजगी विद्यार्थ्यांसाठी २० गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीप्रमाणे होणार आहे.

६) सामाजिक शास्त्रे:-

(I) **पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी**(अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी) सामाजिकशास्त्रे विषयास इ. १० वी परीक्षेस पुनर्परिक्षार्थी म्हणून परीक्षेस प्रविष्ठ झाल्यास लगतच्या वर्षाचे अंतर्गत मूल्यमापनाचे गुण शाळेने पाठवावयाचे असल्यामुळे याबाबतचे रेकॉर्ड शाळेने जपून ठेवणे आवश्यक आहे.

(II) **खाजगी विद्यार्थी:-** (Private Candidate) खाजगी विद्यार्थ्यांना पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने सामाजिक शास्त्रे या विषयासाठी अंतर्गत मूल्यमापनाचे गुण असणार नाहीत.

७) **दिव्यांग विद्यार्थ्यांबाबत:-** माध्यमिक स्तरावरील इ.९ वी च्या/ १० वीच्या विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी विषययोजना व मूल्यमापन योजनेच्या कार्यवाहीबाबत राज्य मंडळाने परिपत्रक क्र.रा.मं./ संशोधन/ वि.ग.अ.वि. (दिव्यांग) वि.वि.यो./ मू.यो./३२९० दि.२२ जून २०१८ अन्वये परिपत्रक निर्गमित केले आहे. त्यामध्ये मुख्यत: कार्यशिक्षण या विषयाची माहिती दिली आहे. नियमीत विद्यार्थ्यांना कार्यशिक्षण विषय घेता येणार नाही, फक्त दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विषय योजनेप्रमाणे कार्यशिक्षण अंतर्गत असलेल्या एकूण ९ विषयांपैकी कोणत्याही एका विषयाला पर्यायी विषय म्हणून घेता येईल.

८) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी जून्या अभ्यासक्रमाची परीक्षा देण्याची संधी:-

१० वी पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून सुरू होत असल्यामुळे मार्च २०१८ च्या परीक्षेअखेर उत्तीर्ण होवू न शकलेल्या विद्यार्थ्यांना जुलै २०१८ व मार्च २०१९ अशा दोन संधी उपलब्ध राहतील. त्यामध्ये काही विद्यार्थी उत्तीर्ण न झाल्यास मात्र त्यांना पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार परीक्षेस प्रविष्ठ व्हावे लागेल.

वरील सर्व सूचना आपल्या विद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात व परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी. मंडळाच्या **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर तसेच विद्या प्राधिकरण व बालभारतीच्या संकेतस्थळावर हे परिपत्रक उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

(डॉ.अशोक भोसले)
प्र.सचिव
राज्यमंडळ, पुणे ०४

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:

१) विभागीय सचिव, सर्व विभागीय मंडळे,

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.

३) सर्व शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद,शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई

प्रत माहितीसाठी सविनय सादर:

१) मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

२) मा.शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१

३) मा.शिक्षण संचालक, (माध्य.व उ.माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, शिक्षण संचालनालय, पुणे-१

४) मा. संचालक,विद्याप्राधिकरण, सदाशिव पेठ, पुणे-३०

५) मा.संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११००४.